# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- नवजात अर्भक चोरी झाल्यास संबंधित रुग्णालयाचा परवाना रद्द करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश
- कैद्यांच्या कोठडीतल्या मृत्यूप्रकरणी भरपाईला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी– लातूरच्या पूरणमल लाहोटी तंत्रनिकेतनमध्ये अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाला मान्यता
- एसटी बसमध्ये जीपीएस, पॅनिक बटण आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा महामंडळाचा निर्णय

आणि

- जलसंपदा विभागाच्या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याला प्रारंभ

****

एखाद्या रुग्णालयातून नवजात अर्भकाची चोरी झाल्यास सर्वात आधी त्या रुग्णालयाचा परवाना रद्द करण्यात यावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. उत्तर प्रदेशातल्या बाल तस्करीच्या प्रकरणात आरोपींकडून दाखल झालेल्या जामीन अर्जावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली, त्यावेळी न्यायमूर्ती जे.बी.पारडीवाला आणि आर.महादेवन यांच्या पीठानं, बाल तस्करीच्या प्रकरणांची सुनावणी सहा महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे निर्देश उच्च न्यायालयांनी कनिष्ठ न्यायालयांना द्यावेत, असं सांगितलं. याशिवाय, या प्रकरणांची सुनावणी दररोज करायला हवी, असंही न्यायालयानं बजावलं आहे. हे निर्देश पाळण्यात कुचराई झाल्यास तो न्यायालयाचा अवमान समजला जाईल, असा इशाराही सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे.

****

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानुसार, कैद्यांच्या कोठडीतल्या मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या धोरणानुसार कारागृहात काम करताना झालेला अपघात, वैद्यकीय अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा, कारागृह कर्मचाऱ्यांची मारहाण किंवा कैद्यांच्या आपापसातील भांडणामुळे कैद्याचा मृत्यू झाल्यास तसंच संबंधित प्रकरणात प्रशासनाचा निष्काळजीपणा चौकशीतून सिद्ध झाल्यास, कैद्याच्या वारसांना पाच लाख रुपयांची भरपाई दिली जाणार आहे. राज्यातील सर्व कारागृहांमध्ये हे धोरण लागू राहणार आहे. मात्र वार्धक्य, दीर्घ आजार, कारागृहातून पलायन करतांना किंवा जामीनावर असताना, अथवा उपचार नाकारल्याने कैद्याचा मृत्यू झाल्यास कोणतीही भरपाई देण्यात येणार नाही.

ठाणे जिल्ह्यात चिखलोली-अंबरनाथ इथे कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करण्याचा, आणि त्याअनुषंगानं आवश्यक पदं मंजूर करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. इतरही अनेक निर्णय या बैठकीत घेण्यात आले.

***राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता व नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याच्या नियमांमध्ये एकवाक्यता आणण्यात येणार हे. त्याकरिता नवीन दरांबाबत अधिसूचना काढण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या भागांतल्या मालमत्ता करांची वसुली व्हावी, यासाठी यावरचा दंड अंशतः माफ करण्याची अभय योजना लागू करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.***

***नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला. नगर परिषदा, नगरपंचायती तसंच औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमतानं हटवण्याच्या तरतुदींना मंत्रिमंडळानं या बैठकीत मान्यता दिली.***

***लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मध्ये आगामी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने या बैठकीत घेतला आहे.***

****

राज्य परिवहन महामंडळाकडच्या सध्याच्या १२ हजार बसगाड्यांसह नव्या अडीच हजार गाड्यांमध्ये जीपीएस, पॅनिक बटण अर्थात वैद्यकीय अलार्म आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय महामंडळानं घेतला आहे. याशिवाय आगामी शैक्षणिक वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्येही देखील सीसीटीव्ही कॅमेरे लावणं बंधनकारक असणार आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून याबाबतच्या नव्या नियमावलीची अंमलबजावणी होणार असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

****

येत्या एकवीस ते चोवीस एप्रिल या कालावधीत मुंबईतल्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र अकादमीमध्ये 'मराठी चित्रपट महोत्सव-२०२५' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात दाखवण्यात येणार असलेल्या एक्केचाळीस चित्रपटांची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज केली. चित्रपट रसिकांना हे चित्रपट विनामूल्य बघायला मिळणार आहेत. यासाठीची ऑनलाईन नाव नोंदणी सुरू करण्यात आली असून कार्यक्रमस्थळी ऑफलाईन नावनोंदणी देखील सुरू आहे.

****

निलंबित आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर हिला सर्वोच्च न्यायालयानं २१ एप्रिलपर्यंत अटकेपासून संरक्षण दिलं आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या पीठासमोर आज या प्रकरणाची सुनावणी झाली. दिल्ली उच्च न्यायालयानं पूजा खेडकर हिचा अटकपूर्व जामीन फेटाळला होता, त्या निर्णयाविरोधात खेडकरनं सर्वोच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली होती.

****

जलसंपदा विभागामार्फत राज्यात १५ ते ३० एप्रिल या कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५'चं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर, लातूर आणि बीडसह ठिकठिकाणच्या जिल्हा मुख्यालयांमध्ये या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचं उद्घाटन आज करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दीप

प्रज्वलन तसंच जलपूजन करण्यात आलं. उपस्थितांना यावेळी जलबचत प्रतिज्ञा देण्यात आली.

या पंधरवड्यात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तीर्मनवार यांनी अधिक माहिती दिली.

**बाईट – संतोष तीर्मनवार**

****

बीड जिल्ह्यात तीन ठिकाणी पुरावे नसताना बोगस पद्धतीनं मोठ्या प्रमाणावर जन्मदाखले देण्यात आल्याचे प्रकार झालेले असून, परळीतलं महसूल प्रशासन यात आघाडीवर असल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमैय्या यांनी केला आहे. सोमय्या यांनी आज परळी पोलीस ठाण्याला भेट देत, सर्व संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. याप्रकरणी दोन–तीन दिवसात परळीत गुन्हा दाखल करण्यात येईल असं आश्वासन पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्याला दिल्याचं किरीट सोमैय्या यांनी प्रसार माध्यमांना सांगितलं.

दरम्यान, बांगलादेशी घुसखोरांच्या नावाखाली मुस्लिम समाजाला लक्ष्य केलं जात असल्याचा आरोप करत, सोमय्या यांना आज परळीत काही जणांनी काळे झेंडे दाखवल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

या वर्षीच्या पावसाळ्यात देशाच्या बहुतांश भागांमध्ये सरासरीहून जास्त पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे. या खात्याचे महासंचालक डॉक्टर मृत्युंजय मोहपात्रा यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यंदाच्या पावसाळ्यावर एल निनो किंवा ला निना यापैकी कशाचाही प्रभाव नसल्याचं मोहपात्रा यांनी सांगितलं.

****

मराठवाड्यासह राज्यात सर्वत्र उन्हाचा जोर असून, पुढच्या चार ते पाच दिवसात कमाल तापमानात दोन ते तीन अंशांची वाढ होण्याची शक्यता मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं वर्तवली आहे, मात्र, आजपासून येत्या सतरा तारखेपर्यंत मराठवाड्यातल्या नांदेड, धाराशिव, लातूर जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस होण्याची शक्यताही या केंद्रानं वर्तवली आहे.

दरम्यान, राज्यात आज सर्वाधिक ४३ अंश सेल्सिअस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात बीड इथं सुमारे ४२ अंश, धाराशिव इथं सुमारे ४० अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ४० पूर्णांक आठ तर परभणी इथं ४१ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****

भंडारा वन विभागाच्या रावणवाडी परिसरात 'इंडियन ग्रे वुल्फ' म्हणजेच भारतीय लांडगा आढळल्यामुळे वन्यजीव अभ्यासक आणि स्थानिकांमध्ये कुतुहल निर्माण झालं आहे. प्रसिद्ध वन्यजीव छायाचित्रकार विवेक हुरा यांना या लांडग्याचं दर्शन झालं. चौदा वर्षांनंतर या भागात भारतीय लांडगा आढळला आहे. महाराष्ट्रात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमधल्या अर्ध-सदाहरित जंगलांमध्येही या लांडग्यांचं अस्तित्व असल्याचा अंदाज आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या वतीने चालवण्यात येण्याऱ्या शहर बसेसच्या तिकीटाच्या दरामध्ये २० टक्के दरवाढ करण्यात आली आहे. ही दरवाढ उद्या १६ एप्रिलपासून लागू होणार आहे.

****